

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## व्यवस्थापन परिषदेच्या तातडीच्या १५२ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत
## मंगळवार, दि. २१ फेब्रुवारी, २०२३ सकाळी १०:०० वा.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
॥ विद्यया संपन्नता ॥
NAAC Accredited-2022
'B++'Grade (CGPA-2.96)

प्रस्तुत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची तातडीची १५२ वी बैठक मंगळवार, दि.२१ फेब्रुवारी, २०२३ रोजी सकाळी ११:०० वा. व्यवस्थापन परिषद सभागृहात मा.कुलगुरु महोदया यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीस उपस्थिती खालीलप्रमाणे होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| १) | डॉ. मृणालिनी फडणवीस, कुलगुरु | अध्यक्षा | उपस्थित |
| २) | डॉ. राजेश दत्तात्रय गादेवार, प्र-कुलगुरु | सदस्य | उपस्थित |
| ३) | प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत | सदस्य | उपस्थित |
| ४) | प्राचार्य डॉ. शंकर दत्तात्रय नवले | सदस्य | उपस्थित |
| ५) | डॉ. सिद्राम नारायण सलवदे | सदस्य | उपस्थित |
| ६) | प्रा. डॉ. गौतम सुबण्णा कांबळे | सदस्य | उपस्थित |
| ७) | प्राचार्य डॉ. भिमाशंकर मुर्गप्पा भांजे | सदस्य | उपस्थित |
| ८) | प्राचार्य डॉ. निवृत्ती बाबुराव पवार | सदस्य | उपस्थित |
| ९) | डॉ. सुशिल कुमार शिंदे | सदस्य | उपस्थित |
| १०) | डॉ. समाधान दिगंबर पवार | सदस्य | उपस्थित |
| ११) | श्री. महादेव दऱ्याप्पा कमळे | सदस्य | उपस्थित |
| १२) | श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील | सदस्या | उपस्थित |
| १३) | श्री. सुधाकर तुकाराम सरवदे | सदस्य | उपस्थित |
| १४) | श्री. सचिन मारुती गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १५) | डॉ. अजित माधव पाटणकर | सदस्य | उपस्थित |
| १६) | डॉ. उमेश काकडे, विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), सोलापूर (मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई, व मा.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे नामनिर्देशित) | सदस्य | उपस्थित |
| १७) | मा. संचालक (तंत्रशिक्षण), तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई | सदस्य | अनुपस्थित |
| १८) | सीए श्रेणिक हुकुमचंद शहा वित्त व लेखा अधिकारी | निमंत्रित | उपस्थित |
| १९) | प्राचार्य डॉ. शिवाकुमार सुगण्णा गणपूर संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | निमंत्रित | उपस्थित |
| २०) | श्रीमती योगिनी रमेश घारे - कुलसचिव | सदस्य सचिव | उपस्थित |

बैठकीची सुरवात विद्यापीठ गीताने करण्यात आली.

**स्वागत:**

कुलसचिव यांनी मा.अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले. तसेच नव्याने नामनिर्देशित झालेले प्राचार्य डॉ. भि. मु. भांजे, प्राचार्य डॉ. नि. बा. पवार, डॉ. सु. कु. शिंदे, डॉ. स. दि. पवार, श्री. म. द. कमळे, श्रीमती प. प्र. मोहिते-पाटील, श्री. सु. तु. सरवदे, श्री. स. मा. गायकवाड व डॉ. अ. मा. पाटणकर यांची ही पहिलीच बैठक असल्याने त्यांचे मा. कुलगुरु महोदया यांचे हस्ते पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

**श्रध्दांजली:**

व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा. डॉ. गौतम कांबळे यांच्या मातोश्रींचे दि.०९/०२/२०२३ रोजी निधन झाल्याने त्यांना श्रध्दांजली वाहण्यात आली.

बैठकीत खालीलप्रमाणे कामकाज झाले.

विषय क्र.१ दि.०२ फेब्रुवारी, २०२३ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १५१ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.

कुलसचिव यांनी दि. ०२ फेब्रुवारी, २०२३ रोजी झालेल्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून दाखविला असता, सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

| | |
|---|---|
| ठराव : | दि. ०२ फेब्रुवारी, २०२३ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १५१ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून सर्वानुमते कायम करण्यात आला. |

**विषय क्र.२ महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०५(२)(ड) मधील तरतदीनुसार संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण या पदाच्या निवड समितीवर व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशन करावयाची बाब विचारार्थ.**

टिपणी: प्रस्तुत विद्यापीठास मंजूर असलेल्या संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण या पदावर कार्यरत असलेल्या डॉ. सुरेश किसनराव पवार हे नियत वयोमानानुसार दि.३१/०८/२०२२ रोजी सेवानिवृत्त झाल्याने त्यांना दि.३१/०८/२०२२ रोजीच्या कार्यालयीन आदेशान्वये संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण या पदावरुन सेवामुक्त करण्यात आल्याने संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण हे पद दि.०१/०९/२०२२ पासून रिक्त असून सदर पदाचा अतिरिक्त कार्यभार डॉ. अशोक भीमराव पाटील यांच्याकडे सोपविण्यात आला आहे.

डॉ. सुरेश किसनराव पवार हे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्याने रिक्त झालेल्या संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण या पदाची जाहिरात दि.१९/११/२०२२ रोजीच्या दैनिक लोकमत, दैनिक दिव्यमराठी, लोकसत्ता वेस्टर्न पॅकेज, Association of Indian Universities, New Delhi यांच्या आवृत्तीमध्ये तसेच प्रस्तुत विद्यापीठाच्या su.digitaluniversity.ac.in व महाराष्ट्र शासनाच्या Maharashtra.gov.in संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आली होती व सदर जाहिरातीनुसार आवेदनपत्र सादर करण्याची अंतिम मुदत दि.२१/१२/२०२२ पर्यंत होती.

सदर जाहिरातीच्या अनुषंगाने विहित कार्यवाही करुन संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण या पदासाठी प्राप्त झालेल्या आवेदनपत्रांमधून पात्र ठरणाऱ्या उमेदवारांची मुलाखत घ्यावी लागणार आहे. सदर मुलाखती घेण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०५(२) मधील तरतुदीनुसार निवड समिती गठीत करावी लागणार असून त्यामध्ये खालीलप्रमाणे तरतुद केलेली आहे.

कलम १०५(२)(ड) - व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित करावयाचा, व्यवस्थापन परिषदेचा सदस्य असलेला एक निर्वाचित प्राचार्य किंवा अध्यापक.

उपरोक्त तरतुदीच्या अनुषंगाने संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण पदाच्या निवड समितीवर व्यवस्थापन परिषदेचा सदस्य असलेला एक निर्वाचित प्राचार्य किंवा अध्यापक यांचे व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशन करणे आवश्यक आहे.

सबब, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०५(२)(ड) मधील तरतदीनुसार संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण या पदाच्या निवड समितीवर व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशन करावयाची बाब विचारार्थ.

| ठराव : | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०५(२)(ड) मधील तरतदीनुसार संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण या पदाच्या निवड समितीवर व्यवस्थापन परिषद सदस्य प्राचार्य डॉ. भिमाशंकर मुर्गप्पा भांजे यांचे सर्वानुमते नामनिर्देशन करण्यात आले.** |
|---|---|

**विषय क्र.३** Associated Garment Cluster Foundation **आणि** Annapurna Foundation, Solapur's Jai Hind Food Bank, Solapur **यांच्यासमवेत प्रस्तुत विद्यापीठाने केलेल्या सामंजस्य कराराची (MoU) बाब माहितीस्तव.**

टिपणी: गारमेंट असोसिएशन सोबत झालेल्या सामंजस्य करारामुळे विद्यार्थी विकासात आपल्याला खूप फायदा मिळू शकतो. या सामंजस्य करारातून ट्रेनिंग गेस्ट लेक्चर किंवा कार्यानुभव यासारख्या गोष्टींमध्ये विद्यार्थ्यांचा विकास होऊ शकतो. तसेच जय हिंद फूड बँक सोबत झालेल्या सामंजस्य करारातून सामाजिक बांधिलकी जपली जाऊ शकते तसेच आपल्या विद्यार्थ्यांना सामाजिक बांधिलकी जपण्यास प्रवृत्त करुन समाज प्रबोधनात मोलाचे योगदान होऊ शकते तसेच विविध क्षेत्रात समाजकार्य करण्यासाठी सुध्दा मदत होऊ शकते. याचाच एक भाग म्हणून विद्यापीठाचे विद्याविषयक ध्येय व धोरणे वृध्दिंगत करण्यासाठी खालील शैक्षणिक संस्थाशी सामंजस्य करार (MoU) करण्यात आलेले आहेत.

| Sr. No. | Name of the Company / Institute | Concern Department / School | MoU signed Dated |
|---|---|---|---|
| 1 | Associated Garment Cluster Foundation | School of Commerce and Management | 15/01/2022 |
| 2 | Annapurna Foundation, Solapur's Jai Hind Food Bank, Solapur | School of Commerce and Management | 15/01/2022 |

सबब, वाणिज्य व व्यवस्थापन संकुलातील दि.१५/०१/२०२३ रोजी झालेल्या सामंजस्य कराराची (MoU) बाब माहितीस्तव.

| ठराव : | **Associated Garment Cluster Foundation आणि Annapurna Foundation, Solapur's Jai Hind Food Bank, Solapur यांच्यासमवेत प्रस्तुत विद्यापीठाकडून सामंजस्य करार (MoU) करण्यास तातडीची बाब म्हणून, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये कुलगुरु महोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने दिलेल्या मान्यतेची नोंद घेण्यात आली.** |
|---|---|

**विषय क्र.४ कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे ज्ञारस्त्रोत केंद्र समितीच्या दि.३०/१२/२०२२ रोजी झालेल्या २५ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत विचारार्थ.**

टिपणी: ज्ञानस्त्रोत समितीची दि.३१/१२/२०२२ रोजी बैठक संपन्न झाली. या बैठकीतील विषय पत्रिकेवर केंद्राकडून विद्यार्थ्यांना जे ओळखपत्र दिले जाते, त्यासाठी आवश्यक असणाऱ्या Smart Card Cover आणि Smart Card Lace खरेदी करण्यात येणाऱ्या फर्मसोबत तीन वर्षासाठी दरकरार करण्याची बाब, सन २०२२ ते २०२५ या तीन वर्षाकरिता पुस्तके व नियतकालिके सोबत जोडलेल्या यादीतील विक्रेते यांचेकडून खरेदी करणेबाबतची बाब, पीएच.डी. प्रबंध शोधगंगा या संकेतस्थळावर अपलोड करण्याकरिता प्रत्येक महिन्याची माहिती शैक्षणिक, संशोधन व विकास विभागाकडून ज्ञानस्त्रोत केंद्राकडे पाठविण्याबाबतची बाब इ. विषय विचारार्थ होते. तसेच ज्ञानस्त्रोत केंद्रास डॉ. रा. श्री. मोरवंचीकर, औरंगाबाद यांनी देणगी दाखल दिलल्या पुस्तकांचे वेगळे दालन करुन त्यास "राधा-लक्ष्मी दालन" असे नाव दिल्याची बाब, ज्ञानस्त्रोत केंद्रामार्फत शिक्षक, विद्यार्थी व कर्मचारी यांना पुस्तक घेतल्यानंतर व पुस्तक जमा केल्यानंतर त्यांच्या भ्रमणध्वनीवर एसएमएस (SMS) पाठविण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असल्याची बाब इ. विषय माहितीस्तव होते.

सबब, ज्ञानस्त्रोत समितीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ९६(५)(घ) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

| | |
|---|---|
| ठराव : | **कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे ज्ञारस्त्रोत केंद्र समितीच्या दि.३०/१२/२०२२ रोजी झालेल्या २५ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |

विषय क्र.५ दयानंद इन्स्टिट्युट, सोलापूर या संस्थेच्या अंतर्गत असलेले डी.ए.व्ही.वेलणकर वाणिज्य महाविद्यालय, सोलापूर या महाविद्यालयातील नियमित प्राचार्याच्या नियुक्तीसंदर्भात दि.१३/०१/२०२३ रोजीच्या व्यवस्थापन परिषद बैठकीतील ठराव क्र.१२ नुसार गठीत त्रिसदस्यीय समितीचा अहवाल विचारार्थ.

टिपणी: दि.१३ जानेवारी, २०२३ रोजीच्या व्यवस्थापन परिषद बैठकीतील ठराव क्र.१२ नुसार दयानंद इन्स्टिट्युट, सोलापूर या संस्थेच्या अंतर्गत असलेले डी.ए.व्ही.वेलणकर वाणिज्य महाविद्यालय, सोलापूर या महाविद्यालयातील नियमित प्राचार्याच्या नियुक्तीसंदर्भात विद्यापीठामध्ये झालेल्या सुनावणी अहवालाच्या अनुषंगाने वस्तुस्थिती/सत्यता पडताळणी करण्यासाठी त्रिसदस्यीय समिती नेमण्यात आली होती. याबाबत समिती अध्यक्ष/सदस्य व संस्था स्थानिक सचिव यांना पत्र क्र. पुअहोसोविसो/शिमा-१/२०२२-२३/६२०, दि.१९/०१/२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे. त्याअनुषंगाने समितीची पहिली बैठक दि.०२/०२/२०२३ रोजी दुपारी ०२.३० वा. संपन्न झाली.

तसेच सदर समितची दुसरी बैठक दि.१७/०२/२०२३ रोजी दुपारी ०३.०० वा. व्यवस्थापन परिषद सभागृह येथे आयोजित करण्यात आलेली आहे. सदर बैठकीबाबत विद्यापीठ पत्र क्र.पुअहोसोविसो/शिमा-१/२०२२-२३/१२४३, दि.१४/०२/२०२३ रोजीच्या पत्रान्वये समिती अध्यक्ष, सदस्य व संस्था स्थानिक सचिव यांना बैठकीस उपस्थित राहणेबाबत कळविण्यात आलेले आहे.

सदर बैठक संपन्न झाल्यानंतर वरीलप्रमाणे गठीत समितीचा प्राप्त होणारा अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

<table>
<tr><td>ठराव :</td><td>दयानंद इन्स्टिट्युट, सोलापूर या संस्थेच्या विविध मुद्यांच्या संदर्भात नेमलेल्या समितीच्या अहवालातील शिफारशी स्विकारण्यात आल्या. मात्र संस्थेने रु.५ लाख (अक्षरी रुपये पाच लाख फक्त) दंड एकाच वेळी न भरता प्रथम रु.२.५० लाख (अक्षरी रुपये दोन लाख पन्नास हजार फक्त) एका महिन्यात भरावेत. विद्यापीठाने व समितीने सूचविलेल्या शिफारसींची पूर्तता करण्याकरिता संस्थेला एक वर्ष संधी देण्यात यावी. एक वर्षात सुधारणा झाल्यास उर्वरित दंड रु. रु.२.५० लाख (अक्षरी रुपये दोन लाख पन्नास हजार फक्त) माफ करण्यात यावा व सुधारणा न झाल्यास उर्वरीत रुपये २.५० (अक्षरी रुपये दोन लाख पन्नास हजार फक्त) इतका दंड संस्थेकडून घेण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.<br><br>सदर ठरावास प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत, प्राचार्य डॉ. निवृत्ती बाबुराव पवार, श्री. महादेव दऱ्याप्पा कमळे व श्री. सुधाकर तुकाराम सरवदे यांनी भिन्न (Dissent) मत नोंदविले.<br><br>तसेच डॉ. अजित माधव पाटणकर यांनी ठरावावर तटस्थ राहण्याची भूमिका घेतली.</td></tr>
</table>

मा. कुलगुरु तथा अध्यक्ष महोदयांच्या परवानगीने आयत्या वेळेचे विषय:

विषय क्र. ६(१) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील विविध संकुलातील प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, सहाय्यक प्राध्यापक यांची सात रिक्त पदे भरण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

ठराव : शासनाच्या आरक्षण निर्देशांनुसार पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील विविध संकुलांमध्ये खालीलप्रमाणे सात पदे भरण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

| अ.क्र. | संकुलाचे नाव | पद | मंजूर पद संख्या |
|---|---|---|---|
| १ | रसायनशास्त्र संकुल | प्राध्यापक | १ |
| | | सहयोगी प्राध्यापक | १ |
| २ | भूशास्त्र संकुल | प्राध्यापक | १ |
| | | सहयोगी प्राध्यापक | १ |
| ३ | सामाजिकशास्त्रे संकुल | सहयोगी प्राध्यापक | १ |
| ४ | संगणकशास्त्र संकुल | सहयोगी प्राध्यापक | १ |
| ५ | भौतिकशास्त्र संकुल | सहयोगी प्राध्यापक | १ |

मा.कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु व सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले व राष्ट्रगीतानंतर बैठक समाप्त झाली.

सदस्य सचिव
व्यवस्थापन परिषद

अध्यक्ष
व्यवस्थापन परिषद